R.No. MHHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ३८

दि. १८ जानेवारी २०२६, वार : रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे विजयी उमेदवार, विविध पक्ष, संघटना पदाधिकारी यांच्या भेटी घेत साधला संवाद







लातूर प्रतिनिधी: राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री, महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि. १७ जानेवारी रोजी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेले मतदार, काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या भेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधला.

तसेच लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीला मिळालेले यश आणि या विजयासाठी अथक परिश्रम घेतलेल्या पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ते आणि लातुर मधील मतदार बंधू भगिनी यांच्याकडून काँग्रेस व वंचित बहुजन आघाडी उमेदवाराना मिळालेला प्रतिसाद याबद्दल सर्वांचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आभार मानून या निवडणुकीतील विजयाबद्दल विजयी काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे बाभळगाव निवासस्थानी उपस्थित असलेल्या उमेदवारांचे अभिनंदन केले. सर्व विजयी उमेदवार यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी आमदार वैजनाथ शिंदे, माजी महापौर दीपक सूळ, विलास को-ऑपरेटिव बँक व्हा.चेअरमन समद पटेल, दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष-श्रीशैल उटगे, औसा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष- किरण बाबळसुरे, गणपत बाजुळगे, विकास कांबळे, चंद्रकांत धायगुडे, विष्णूदास धायगुडे, अमर खानापुरे, अनिलकुमार माळी, एकनाथ पाटील, सुरेश चव्हाण,सुदर्शन बोराडे, सौरभ सुतार,बळवंत पांचाळ, मोहन पोतदार,भागवत पांचाळ, आनंद पांचाळ, सुदाम पांचाळ, प्रकाश कासट ,ॲड. अतिष चिकटे, सूर्यकांत कातळे, सतीश साळुंके,भालचंद्र सोनकांबळे, गोटू यादव,आरिफ़ शेख,सचिन पाटील, राम कोंबडे, जालिंदर बरडे, अविनाश देशमुख, सपना किसबे, पप्पू धोत्रे, अभिजीत अंकलकोटे, डॉ.अभय कदम, डॉ. मनोज देशमुख, रोहिणी शिंदे, दिगंबर वीर, व्यंकट जाधव, राजकुमार कते, प्रा.भालचंद्र येडवे,श्रीशैल गडगडे,डॉ. हनुमंत किनीकर, सिकंदर पटेल, लायक पटेल,सुधीर गोजमगुंडे,सूर्यप्रकाश धूत, बसवंतआप्पा भरडे, योगेश स्वामी, बंडू किसवे, डॉ.अजय जाधव,ॲड.फारुख शेख,बाभळगाव उप सरपंच गोविंद देशमुख,अविनाश देशमुख,उमाकांत मस्के,ॲड. उदय गवारे, शिवाजी सूर्यवंशी, पवनकुमार गायकवाड, प्रा.सुधीर अनवले, प्रा. प्रवीण कांबळे,योगेश स्वामी,मनोज देशपांडे,रमेश कुंभार,उमेश सोनवळकर,बालाजी चव्हाण,श्याम कुंभार, अशोक कटके,प्रा. हरिभाऊ जवळगेकर, अमित जाधव, डॉ. बालाजी साळुंखे, मसूद काझी, शिवकुमार मिसे,सैफ़ सय्यद,अनवर सय्यद, संजय कांबळे, डॉ. रमेश भराटे, डॉ.गजानन चव्हाण, डॉ. कल्याण बरमदे, डॉ. राहुल सुळ,डॉ. आनंद पवार,डॉ. आनंद पाटील, डॉ.राजकुमार दाताळ,डॉ. प्रियंका डावळे,डॉ. देवाशिष रुईकर,डॉ. ऋषिकेश हरिदास, डॉ. विश्रांत भारती, प्रवीण घोटाळे,साक्षी घोटाळे, पंढरी भंडारे, नंदू भंडारे, तनुजा कांबळे,जयश्री पाटील,बाळकृष्ण धायगुडे, शैलेश बोईनवाड,सत्यवान कांबळे,नवनाथ केंद्रे,सचिन बंडापल्ले,फारुख शेख, स्वयंप्रभा पाटील, प्रा.संजय ओहाळ, महेश देशमुख, गणेश पवार, नानाराव भोसले, मधूकर बेद्रे,श्रीधर सांगवे,अशोक गोविंदपुरकर, बालाप्रसाद बिदादा, अब्दुल खदिर, मोहसीन पठाण, सय्यद अशराद,मेहबूब शेख,रतन बीदादा,चंदूलाल बलदवा,सत्तार शेख,शंकरराव पाटील,अफजल कुरेशी, जावेद मनियार,जुबेर सय्यद,आबेद गोलंदाज, मनोज स्वामी,पद्माकर वाघमारे,रमेश बिराजदार, असलम चाऊस,सिराज शेख,दत्तात्रय ठाकूर,धीरज पाटील,अमोल कुतवळ,अमर मगर,बालाजी मुस्कावाड,सुरेश बावणे,सचिन गंगावणे,रोहित दयाळ, केतन हलवाई,अक्षय बनसोडे,पंडित शिंदे, लाला पटेल, कैलास होळकर, अमित जाधव,ॲड. विजय कुमार जाधव, धर्मराज पाटील, ॲड. प्रशांत जाधव, नासिर कुरेशी, अब्दुल गालीब शेख आदिसह काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते,नागरिक उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची निलंगा नगरपरिषदेचे नगरसेवक इस्माईल मणियार यांचे पुतने अजान मणियार यांनी भेट घेऊन काँग्रेस पक्ष व पक्षाचे कार्य याबाबत आपले विचार त्यांच्या समोर व्यक्त केले. यावेळी निलंगा शहर काँग्रेसचे अध्यक्ष, नगरसेवक-अजित नाईकवाडे, प्रा.गजेंद्र तरंगे, नगरसेवक- इस्माईल मणियार,अभिजित वांजरवाडे,सुरज पेठकर, सिराज देशमुख, गणेश पेठकर, प्रशांत वांजरवाडे यांच्यासह निलंगा काँग्रेसचे पक्ष पदाधिकारी उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत निवडणूक प्रक्रियेबाबत राजकीय पक्ष प्रतिनिधींची बैठक




लातूर, : राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे सर्व राजकीय पक्ष, उमेदवार यांनी पालन करणे आवश्यक आहे. या नियमांबाबत राजकीय पक्षांनी आपल्या पदाधिकाऱ्यांना, उमेदवारांना माहिती द्यावी. या नियमांचे पालन करून निवडणूक प्रक्रिया शांततामय व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे केले.

लातूर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत १० पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या राजकीय पक्ष पदाधिकारी यांच्या बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होत्या. अप्पर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, सामान्य प्रशासनच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, निवडणूक निर्णय अधिकारी शरद झाडके अविनाश कोरडे, सुशांत शिंदे, मंजुषा लटपटे, रोहिणी नऱ्हे-विरोळे, संदीप कुलकर्णी, गणेश पवार, अहिल्या गाठाळ, संगीता टकले, स्वाती दाभाडे यांच्यासह आदर्श आचारसंहिता कक्ष नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेचे अपर मुख्य कार्यकारी अधिकारी अस्लम तडवी, निवडणूक खर्च कक्षाचे नोडल अधिकारी राजेंद्र नागणे यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

नामनिर्देशन पत्र भरण्यापासून ते निवडणूक निकाल जाहीर होईपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने विविध नियम ठरवून दिले आहेत. या नियमांचे पालन करणे सर्वांसाठी बंधनकारक आहे. तसेच निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यापासूनच जिल्हा परिषद व संबंधित पंचायत समिती क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात पथके स्थापन केली आहेत. त्यामुळे राजकीय पक्ष, उमेदवार यांनी आवश्यक परवानगी घेवूनच प्रचार सभा, रॅली याचे आयोजन करावे, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

काही ठिकाणी नवीन मतदान केंद्र करण्यात आली असल्याने संबंधित मतदारांना याबाबत माहिती देण्यात येत आहे. तसेच दुबार मतदारांकडून घोषणापत्र भरून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. प्रचार विषयक विविध परवानग्या देण्यासाठी प्रत्येक निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर कक्ष कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

राजकीय पक्ष, उमेदवार यांच्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या दिशानिर्देशांची, तसेच निवडणूक विषयक महत्वाच्या नियमांची माहिती यावेळी उपस्थित राजकीय पक्ष पदाधिकारी यांना देण्यात आली.

## अर्थशास्त्र, इंग्रजी आणि वाणिज्य विभागांच्या अभ्यास मंडळांचे उद्घाटन संपन्न




मुरुड /महेंद्र आल्टे : समाज जागृती शिक्षण संस्था संचलित, संभाजी कॉलेज मुरुड, ता.जि. लातूर येथे दिनांक १०/ ०१ /२०२६ रोजी (वार-शनिवार) महाविद्यालयामध्ये अर्थशास्त्र, इंग्रजी आणि वाणिज्य विभागाच्या वतीने अभ्यास मंडळाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख उद्घाटक म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. अंधारे एस. व्ही. (स्वीडन) तसेच श्री. महेश भोसले (यशस्वी उद्योजक) उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. अशोक काळम होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला आलेल्या पाहुण्यांचा व अर्थशास्त्र, इंग्रजी आणि वाणिज्य अभ्यास मंडळातील सदस्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.या उद्घाटन कार्यक्रमाच्या प्रसंगी बोलताना श्री. अंधारे एस. व्ही.यांनी विद्यार्थी जीवनातील अनुभव, गुरुचे महत्व सांगून करिअरबद्दल मार्गदर्शन करताना स्वतःमध्ये विविध कौशल्य विकसित करा तसेच इंग्रजी भाषा शिकायला महत्व देऊन, त्यांनी विदयार्थी जीवनात एक ध्येय ठरवून त्यादिशेने वाटचाल करताना अडचणींचा सामना करा, नेहमी स्वतः ला तुला रोज काहीतरी नवीन शिकायचं आहे असं बजावत चला, असे सांगून जीवनातील स्वयंशिस्तचे महत्व स्पष्ट केले.अर्थशास्त्र व वाणिज्य विषयातील वेगवेगळ्या संधीची माहिती दिली. जिद्द,चिकाटी व मेहनतीच्या जोरावर कुठलेही यश प्राप्त करता येऊ शकते.हे वेगवेगळ्या उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांना समजून सांगितले. श्री महेश भोसले यांनीही घडण्या-बिघडण्याच्या या वयात परिस्थितीची जाणीव ठेवून जीवन घडवत असताना संगत किती महत्वाची आहे हे सांगितले तसेच उद्योजक एका रात्रीत होत नाही त्यासाठी कित्येक रात्री कष्ट करण्याची तयारी संयम, चिकाटी, सातत्य अंगी बाळगावे लागते हे स्पष्ट केले तसेच श्री. शिवलिंग चौधरी (मुरुड रेल्वे थांबा संघर्ष समिती सदस्य)यांनीही विद्यार्थ्यांना आदर्श माणसाचा आदर्श सदैव तुमच्या मनात ठेवा, आणि त्यांच्या सारखं होण्याचा प्रयत्न करा असे म्हटले तर अध्यक्षीय समारोप करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम यांनी शिक्षणाच्या माध्यमातून औद्योगिक कौशल्य विकसित करावे कारण ज्याच्याकडे कौशल्य आहे तो त्या कौशल्याच्या बळावर जगात स्वतःचे, स्वतःच्या आई वडिलांचे तसेच गुरुजनांचे, महाविद्यालयाचे नाव एका उंचीवर नेऊ शकतो असे प्रतिपादन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय वाणिज्य विभागातील प्रा.डॉ.कानडे ए

एस.यांनी केले.तर आभार वाणिज्य विभागातील विद्यार्थिनी कु.साखरे प्रिया हिने मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाणिज्य विभागातील विद्यार्थिनी कु.तब्बू पठाण हिने केले. तांत्रिक सहाय्य समाजशास्त्र विभागातील प्रा. उपाडे यांनी केले. प्रमुख उपस्थितीमध्ये वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. एफ.अंबाड,विभागतील प्रा. डॉ. पी.एस.देशमुख प्रा.नाईकनवरे, इंग्रजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.सौ.मीना कदम, प्रा. एम.बी.गायकवाड,प्रा. देवकते, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सूर्यवंशी ए. व्ही., विभागतील प्रा.डॉ.सौ.चित्रा पिचारे, प्रा.शैलेंद्र सुतार, तसेच राज्यशास्त्र विभागातील प्रा.बालणे,अर्थशास्त्र, इंग्रजी व वाणिज्य विभागातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय...

### लातूर महानगरपालिका : रणनीती, समाजकारण आणि जनतेचा स्पष्ट कौल काँग्रेस – वंचितला

नगरपालिकेच्या ७० जागांच्या निवडणुकीने शहराच्या राजकारणात निर्णायक वळण दिले आहे. ही निवडणूक केवळ सत्तांतरापुरती मर्यादित न राहता, राजकीय वक्तव्यांची मर्यादा, संघटनात्मक ताकद, योग्य युतीची गरज आणि सामाजिक प्रतिनिधित्व यांचा समग्र कौल ठरली आहे.

या निवडणुकीत काँग्रेस-वंचित बहुजन आघाडी युतीने एकत्रितपणे ४७ जागा जिंकत महापालिकेवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. काँग्रेसला स्वबळावर ४३ जागा मिळाल्या, तर वंचित बहुजन आघाडीला ४ जागा मिळाल्या. या युतीमुळे विरोधकांचे राजकीय गणित पूर्णतः कोलमडले. भाजप २२ जागांसह प्रमुख विरोधी पक्ष ठरला, तर **राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट)**ला केवळ १ जागेवर समाधान मानावे लागले.

या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत भाजपासाठी अडचणी वाढवणारे अनेक घटक समोर आले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी प्रचारादरम्यान स्वर्गीय लोकनेते विलासराव देशमुख यांच्याबाबत केलेले वक्तव्य अनेक लातूरकरांना खटकणारे ठरले. विलासराव देशमुख हे लातूरच्या विकासाचे, सहकाराचे आणि सर्वसमावेशक राजकारणाचे प्रतीक मानले जातात. राजकीय मतभेद असले तरी अशा नेत्यांबाबत शब्दांची मर्यादा राखणे अपेक्षित होते. मतदारांनी हे वक्तव्य गांभीर्याने घेतल्याचे निकालातून स्पष्ट झाले.

याच काळात भाजपामधील संघटनात्मक गोंधळही उघड झाला. लातूर शहर निवडणूक प्रभारी पदावरून अर्चनाताई पाटील यांची जबाबदारी काढून घेऊन ती संभाजी पाटील यांच्याकडे देण्यात आली. निवडणुकीच्या ऐन तोंडावर झालेल्या या बदलामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला. प्रचाराची दिशा, नियोजन आणि समन्वय यावर त्याचा विपरीत परिणाम झाला, अशी चर्चा राजकीय वर्तुळात झाली.

दुसरीकडे काँग्रेसने मात्र शांत, संयमित आणि दूरदृष्टीपूर्ण रणनीती आखली. या रणनीतीचा केंद्रबिंदू ठरले अमित विलासराव देशमुख. त्यांनी घेतलेला सर्वात महत्त्वाचा आणि राजकीयदृष्ट्या धाडसी निर्णय म्हणजे वंचित बहुजन आघाडीसोबत केलेली युती. हा निर्णय निवडणुकीतील 'मास्टर स्ट्रोक' ठरला. वंचितांची मते फुटण्याऐवजी एकत्र आल्याने विरोधक पूर्णपणे सैरावैरा झाले.

लातूर शहरात वंचित बहुजन आघाडीच्या प्रचाराने वेगळीच ऊर्जा निर्माण केली. सुजात आंबेडकर तसेच आंबेडकर विचारसरणीशी संबंधित नेतृत्वाच्या सभा अत्यंत जोरदार झाल्या. या सभांमधून सामाजिक न्याय, प्रतिनिधित्व आणि हक्कांचा मुद्दा ठामपणे मांडण्यात आला. दलित, वंचित, अल्पसंख्याक आणि तरुण मतदार मोठ्या प्रमाणावर सक्रिय झाले आणि त्याचा थेट फायदा काँग्रेस–वंचित युतीला झाला.

या निवडणुकीतील आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे बौद्ध समाजाचे प्रतिनिधित्व. काँग्रेस, वंचित बहुजन आघाडी आणि भाजप या तिन्ही पक्षांतून मिळून बौद्ध समाजाचे तब्बल १२ नगरसेवक निवडून आले. हे केवळ आकड्यांचे यश नसून, शहराच्या सत्ताकेंद्रात बौद्ध समाजाचा वाढलेला सहभाग दर्शवणारे आहे. सामाजिक न्यायाच्या राजकारणाला हा मोठा बळकटी देणारा संदेश मानावा लागेल.

एकूणच, लातूर महानगरपालिकेचा निकाल हा स्पष्ट संदेश देतो–मतदार आता केवळ घोषणा, आरोप–प्रत्यारोप किंवा भावनिक वक्तव्यांवर मतदान करत नाही. नेतृत्वाची भाषा, संघटनात्मक शिस्त, योग्य युती आणि सामाजिक समन्वय या सर्व बाबी निर्णायक ठरतात. काँग्रेस–वंचित युतीने हे भान राखले; विरोधक मात्र अनेक आघाड्यांवर अपयशी ठरले.

आता स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर काँग्रेस–वंचित युतीवर मोठी जबाबदारी आहे. पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि शहरी विकास या मूलभूत प्रश्नांवर ठोस आणि पारदर्शक कामगिरी करण्याची अपेक्षा लातूरकर करत आहेत. जनतेने दिलेला हा कौल सत्तेचा नव्हे, तर जबाबदारीचा आहे–आणि त्या जबाबदारीचे सोनं करण्याचे आव्हान आता सत्ताधाऱ्यांसमोर उभे आहे.

# 'हिंद दी चादर' गुरु तेगबहादुर साहिब यांच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण

'हिंद दी चादर', श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीमार्फत गेल्यावर्षी ७ डिसेंबर रोजी झालेल्या देखण्या आयोजनानंतर २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत नांदेड येथे भव्य अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी स्वाभिमान आणि देश रक्षणासाठी दिलेले बलिदान अनन्य साधारण आहे. त्यांच्या परिवारातील सदस्यांनीही देशासाठी शहादत दिली. हा गौरवशाली इतिहास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्याचे स्मरण करणारा आणि गुरुंनी देशासाठी दिलेल्या बलिदानावर प्रकाश टाकणारा हा लेख

काश्मीरचा सुभेदार हा शिखांचे नववे गुरु तेगबहादूर साहिब यांच्या मदतीसाठी गेले. 'ना पेह देना ! ना पेह सेना' म्हणत (घाबरायचे नाही व घाबरवायचेही नाही) काश्मीरींच्या रक्षणासाठी गुरु तेगबहादुर साहिब यांनी थेट तत्कालीन सत्तेला आवाहन दिले व दिल्लीकडे कुच केली. आग्रा येथेच तेगबहादुरांना अटक करण्यात आली. दिल्लीला आणून त्यांना धर्मांतराची बळजबरी करण्यात आली. गुरु तेगबहादुरांनी त्यास नकार देऊन लाल किल्ल्यासमोरील चांदणीचौकात बलिदान दिले. त्यांचे हे बलिदान इतिहासात अमर झाले व भारतभूमीचे कवच म्हणून त्यांना 'हिंद दी चादर'म्हणून ओळखले जाते. सत्य व अहिंसेचे प्रेषित असलेल्या तेगबहादुरांनी बलिदान देऊन मानवी स्वातंत्र्याचा व स्वतःस पटेल तो धर्म आचरण्याचा आदर्श भारतीयांना घालून दिला.

श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या सोबत अनेक समाज उभे होते विशेषतः सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, सिंधी समाजांनी या संघर्षात मोलाचे योगदान देत तेगबहादुर साहेबांनी दिलेल्या देश व मानवतेच्या रक्षणाची शिकवण सर्वदूर पोहोचवली. भाई मतीदास, भाई सतीदास आणि भाई दयाल गुरु तेग बहादुरांच्या आत्मसन्मानासाठी आणि गुरुनिष्ठेसाठी शहीद झाले. हे समाज सेवाभाव, साहस आणि श्रद्धेसाठी ओळखले जातात. दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ला परिसरातील चांदणी चौकात सीसगंज गुरुद्वारा सर्व भारतीयांसाठी प्रेरणास्त्रोत ठरला आहे.

**त्याग व शौर्याचे प्रतीक 'सीसगंज' आणि 'रकाबगंज' गुरुद्वारा**

सरदार बघेलसिंह यांनी १७८३ मध्ये दिल्ली सर करून लाल किल्ल्यावर कब्जा मिळवला आणि गुरू तेगबहादुरांच्या शहीदस्थळी सीसगंज गुरूद्वारा बांधण्यात आला. पुढे १९३० रोजी याच गुरुद्वाऱ्याचे पुनर्निर्माण करण्यात आले. स्वधर्माची ज्योत भारतीयांमध्ये तेवत ठेवण्याकरिता व प्रसंगी बलिदान देण्याचा संदेश देणारा सीसगंज गुरुद्वारा भारतीयांचे मुख्य श्रद्धास्थान ठरले आहे. दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ला परिसरात स्थित सीसगंज गुरुद्वारा हा दिगंबर जैन अतिशय क्षेत्र लालमंदिरापासून सुरु होणाऱ्या चांदणीचौकाकडील रस्त्यावर आहे, तर संसद भवनाच्या मागील भागात रकाबगंज गुरुद्वारा स्थित आहे.

शीख धर्मियांचे मार्गदर्शक दहा गुरु आहेत. यापैकी दोन गुरु हे तेग बहादुरांचे आप्त आहेत. गुरु तेगबहादुर हे शिखांचे नववे गुरू असून सहावे शीखगुरू हरगोविंद यांचे ते सर्वात धाकटे पुत्र व शिखांचे दहावे व शेवटचे गुरू गोविंदसिंह यांचे ते पिता होत. तेगबहादुरांचा जन्म अमृतसर येथे झाला. वयाच्या ८ व्या वर्षी कर्तारपूर येथील लालचंदजी खत्री यांची कन्या गुजरी यांच्याशी तेगबहादुरांचा विवाह झाला. त्यांचे मूळ नाव त्यागमल होते. लहानपणीच त्यांना वैराग्य प्राप्त झाले. गृहस्थ असूनही ते वडिलांच्या मृत्युनंतर बकाला येथे जाऊन विरक्त वृत्तीने राहू लागले.

शिखांचे आठवे गुरू हरकिशन यांच्या निधनानंतर १६६४ मध्ये तेगबहादुर यांना नववे गुरू म्हणून गादीवर बसविण्यात आले. त्यांनी स्वतःसाठी शिवालिक पर्वतराजीत एक नगर वसविले आणि तिथे आपली गादी स्थापून ते धर्मप्रचारासाठी यात्रा करू लागले. हे नगर आनंदपूर म्हणून पुढे शिखांचे प्रसिद्ध व पवित्र क्षेत्र बनले. पाटणा येथे त्यांचे पुत्र गोविंदसिंह यांचा जन्म झाला. पुढे शिखांचे दहावे व शेवटचे गुरू गोविंदसिंह म्हणून ते उदयास आले.

**तेगबहादुर यांच्या कुटुंबातील सात सदस्यांचे बलिदान**

देशहितासाठी प्राणांचे बलिदान देणारे गुरु तेग बहादुर यांनी मोठा आदर्श घालून दिला. त्यांचीच शिकवण पुढे घेऊन जात त्यांच्या कुटुंबीयांनीही बलिदान दिले. आनंदपूरच्या लढायांनंतर सरदार वजीर खानाने गुरू गोविंदसिंग यांच्यावर हल्ला केला. यात मोठे दोन साहिबजादे अजीतसिंग आणि जुझारसिंग यांनी सरदाराच्या सैन्यासमोर शौर्याने लढत वीरगती प्राप्त केली. छोटे साहिबजादे जोरावरसिंग आणि फतेहसिंग यांना त्यांच्या आजी माता गुजरीजींसोबत सरहिंदच्या थडग्यात कैद करण्यात आले. वजीर खानाने त्यांना थंडीच्या रात्री उघड्यावर ठेवले आणि नंतर जिवंतपणे भिंतीत बंद करून मारले. या बलिदानाचे स्मरण करण्यासाठी केंद्र शासनाने २१ ते २७ डिसेंबर हा 'बलिदान सप्ताह' आणि २६ डिसेंबर हा 'वीर बाल दिवस' म्हणून घोषित केला व देशभर तो साजरा केला जात आहे. शिखांचे दहावे व शेवटचे गुरु, गुरु गोविंद सिंग यांनी १४ युद्धे लढली. १७०८ मध्ये नांदेड येथे देश रक्षणासाठी लढताना ते शहीद झाले.




गुरु तेगबहादुरांनी आसामपासून काश्मीरपर्यंत आपल्या सद्विचारांचा प्रसार केला. त्यांनी विविध विषयांवर ११६ पद्ये रचली. ही पद्ये पुढे गुरू गोविंदसिंगांनी गुरु ग्रंथसाहिबात अंतर्भूत केली. यांतील ५९ पद्ये 'शबद' (स्तोत्रे) आणि ५७ पद्ये 'श्लोक' आहेत. त्यांच्या रचनेत वैराग्य व क्षमाशील वृत्तीचा उत्कृष्ट आविष्कार आढळतो. अहिंसा व सत्याचे प्रेषित असलेल्या तेगबहादुरांनी प्राण त्याग करून मानवी स्वातंत्र्याचा व स्वतःस पटेल तो धर्म आचरण्याचा आदर्श भारतीयांना घालून दिला. त्यांच्या बलिदानाने भारतीयांमध्ये जी अस्मिता निर्माण झाली तिला इतिहासात तोड नाही. तेगबहादुर साहिब यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने यावर्षी भारतभर मोठ्या प्रमाणात विविध कार्यक्रम आखण्यात आले आहेत.

'हिंद दी चादर'श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त राज्यभर विविध प्रबोधनपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत नागपूर येथील नारा परिसरातील सुरेश चंद्र सुरी मैदानावर ७ डिसेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्यावर भारतीय डाक विभागामार्फत विशेष टपाल तिकीट जारी करण्यात आले. सिंधी आणि पंजाबी समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणाऱ्या ऐतिहासिक शस्त्रांचे प्रदर्शन लावण्यात आले. विदर्भ आणि छत्तीसगढ मधील शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, वाल्मीकी आणि सिंधी समाजबांधवानी एकत्र येऊन हा ऐतिहासिक समागम कार्यक्रम साजरा केला.

**श्री हुजूर साहिब नांदेड**

शीखांचे दहावे गुरु श्री गोविंद साहिबजी यांची कर्मभूमी ही महाराष्ट्रातील श्री हुजूर साहिब नांदेड असून याठिकाणी त्यांनी सर्व शीख बांधवांना उद्देशून, 'सब सिक्खन को हुकम है गुरू मान्यो ग्रंथ साहिब' असा उपदेश दिला होता. हा मानवतेचा संदेश घरोघरी पोचविण्यासाठी व श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या त्यागाची शिकवण समाजाच्या सर्व घटकांत पोचविण्याच्या उद्देशाने नांदेड येथे येत्या २४ व २५ जानेवारीला शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

नांदेडमध्ये देहरुपी गुरु जाऊन गुरुग्रंथ साहिबची स्थापना झाली. नांदेड येथील बंदासिंग यांनी गुरु गोविंद सिंग यांच्या प्रेरणेने पंजाबात जाऊन परकियांशी लढा दिला व प्रशासक बनले. त्यांनी सरहिंद जिंकून शेतकऱ्यांना जमीन मालकीचा अधिकार दिला आणि स्वराज्याची पायाभरणी केली.

गुरू गोविंद सिंग यांनी १७०६ मध्ये 'जफरनामा' हे पत्र लिहून सत्ता प्रमुखाला नैतिकतेचे आव्हान दिले. हे पत्र फारसी भाषेत असून, त्यात सत्ताधिशांच्या विश्वासघातकी वर्तनाचा, जुलूमांचा आणि शीखांवर केलेल्या अत्याचारांचा समाचार घेतला. पत्र वाचून बादशहाने गुरूजींना सन्मानाने आणण्याचा आदेश दिला, पण गुरुजींनी ते नाकारले. हे पत्र शीख इतिहासातील विजयाचे प्रतीक मानले जाते.

मराठवाड्यातील नरसी नामदेव हे थोर वारकरी संत, संत नामदेवांचे जन्म गावही याच भागात आहे. संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाच्या विस्ताराकरिता देशभ्रमण केले. पंजाबात गेले असता त्यांच्या उद्बोधनाने सर्व समाज भारावला त्यांच्या ६१ अभंगांचा शिखांच्या पवित्र गुरु ग्रंथसाहिबमध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे.

श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचा देशरक्षण, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश महाराष्ट्रातील घराघरात पोहचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासन तसेच शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, वाल्मिकी उदासीन आणि गुरुनानक नामदेव संगत, तखत नांदेड गुरुसाहेब यांचा समावेश असलेल्या श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीमार्फत नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी शहिदी समागम कार्यक्रमास पंजाब, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगना आणि मराठवाड्यातील शीख व अन्य समाज बांधव मोठ्या संख्येने यात सहभागी होणार आहेत. गुरु तेगबहादुरांच्या कार्याची महिती पोचविण्यासाठी प्रत्येक शाळा, महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये वक्तृत्व स्पर्धा, गीते, डाक्युमेंटरी प्रदर्शीत करण्यात येत आहेत. या सर्व आयोजनातून 'हिंद दी चादर'श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे महान विचार आणि अजोड कर्तृत्वाचा परिचय जनतेला होणार आहे.

**रितेश मो. भुयार**
**माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क, नागपूर**

# राष्ट्रीय शिक्षण धोरणातून सक्षम व सृजनशील भारत घडेल – मंत्री चंद्रकांत पाटील

मुंबई, : मुंबई विद्यापीठ हे देशातील नवशिक्षणाची ज्योत प्रज्वलित करणारे अग्रगण्य विद्यापीठ असून न्यायमूर्ती रानडे, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांसारख्या महान विभूतींनी येथे शिक्षण घेतले. त्यांच्या पावलावर पाऊल ठेऊन नवस्नातकांनी देशाच्या प्रगतीत आपले मोलाचे योगदान द्यावे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० हे सक्षम, सृजनशील आणि ज्ञानसमृद्ध भारत घडविण्याचे भक्कम पायाभूत धोरण आहे. या धोरणाद्वारे विद्यार्थ्यांना नवोपक्रम, संशोधन आणि उद्योजकतेची प्रेरणा मिळून देशाच्या सर्वांगीण विकासात त्यांचा सक्रीय सहभाग राहील, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. सर कावसजी जहाँगीर दीक्षान्त सभागृह फोर्ट, मुंबई येथे विद्यापीठाचा वार्षिक दीक्षान्त समारंभ पार पडला त्यावेळी मंत्री पाटील बोलत होते. कार्यक्रमास केंद्र सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार प्रा.अजय कुमार सूद प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, प्र. कुलगुरू प्राचार्य डॉ.अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. पूजा रौंदळे यांच्यासह अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषदेचे मान्यवर सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता यांच्यासोबत विविध महाविद्यालयांचे प्राचार्य आणि विभागप्रमुख, प्राध्यापक उपस्थित होते.मंत्री पाटील म्हणाले, २१व्या शतकात ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मोठे परिवर्तन होत आहे. विद्यार्थ्यांनी 'कसे शिकायचे' हे शिकण्यावर भर द्यावा. राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे शिक्षण अधिक अनुभवात्मक, समावेशक आणि आनंददायी होईल. यामुळे विज्ञानाबरोबरच कला, क्रीडा, संस्कृती आणि मूल्यशिक्षणाचा समावेश होऊन सर्वांगीण विद्यार्थी तयार होतील. शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. शिक्षकांना सक्षम करणे आणि शिक्षण क्षेत्रात सर्वोत्तम बुद्धिमान व्यक्तींना आकर्षित करणे ही काळाची गरज आहे. प्राचीन भारतीय ज्ञानपरंपरेवर आधारित शिक्षण धोरणामुळे आत्मज्ञान, सृजनशीलता आणि सामाजिक जबाबदारी असलेला विद्यार्थी घडेल, असेही मंत्री पाटील यांनी नमूद केले. कुतूहल, सर्जनशीलता आणि नवोपक्रमच देशाच्या प्रगतीचा पाया – डॉ. अजय कुमार सूद-केंद्र सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार डॉ. अजय कुमार सूद म्हणाले की, भारतीय युवक हा जागतिक स्तरावर परिवर्तनाचा वाहक ठरत असून, कुतूहल, सर्जनशीलता व नवोपक्रम यांचा संगम असलेले शिक्षण हे भारताच्या प्रगतीचे आधारस्तंभ ठरणार आहे. शिक्षण पद्धतीत कुतूहल-केंद्रित अध्यापन, संकल्पनात्मक समज आणि प्रत्यक्ष प्रयोगाधारित शिक्षण या तीन बदलांची गरज आहे. दर्जेदार शिक्षण, रोजगारक्षमता आणि कृत्रिम बुद्धिमत्तेतील प्रगती यामुळे भारताला जागतिक नेतृत्व प्राप्त होत



असल्याचे डॉ. सूद यांनी सांगितले. डॉ. सूद यांनी 'एस-लाइफ फ्रेमवर्क'ची संकल्पना मांडत विज्ञानाचे दैनंदिन जीवनाशी नाते, प्रयोगशाळांचा पुनरुज्जीवन, संशोधनाचे अभ्यासक्रमात एकत्रीकरण, विज्ञान महोत्सवांचे आयोजन आणि तरुणांचा डिजिटल सहभाग यावर भर दिला.भारत सरकारचा 'वन नेशन वन सबस्क्रिप्शन' (जडजद) उपक्रम संशोधन क्षेत्रात लोकशाहीकरण करत असून, देशातील लाखो विद्यार्थी जागतिक दर्जाच्या संशोधनापर्यंत पोहोचू असल्याचेही ते म्हणाले. तसेच, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ऊखख २.० च्या माध्यमातून आरोग्य, शेती आणि शाश्वत विकास क्षेत्रात परिवर्तन घडवण्याचे आवाहन त्यांनी केले.महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार पटेल यांसारख्या दिग्गजांच्या पाऊलखुणांवर चालत, आजचा युवक धैर्य, सर्जनशीलता आणि वचनबद्धतेच्या बळावर सक्षम भारत घडवेल, अशा शब्दांत डॉ. सूद यांनी नवस्नातकांना प्रेरित केले.मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.(डॉ.) रविंद्र कुलकर्णी यांनी अहवालाचे वाचन केले.विविध विद्याशाखांतील १ लाख ७२ हजार ५२२ स्नातकांना पदव्या प्रदानया वर्षीच्या दीक्षान्त समारंभामध्ये पदवी आणि पदव्युत्तर मिळून विविध विद्याशाखांतील १ लाख ७२ हजार ५२२ स्नातकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. यामध्ये ८४ हजार ३१८ मुले आणि ८८ हजार २०२ मुलींचा समावेश असून इतर ०२ विद्यार्थी समाविष्ट आहेत. यामध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी १ लाख ४९ हजार ९८२ विद्यार्थ्यांचा समावेश असून पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी २२ हजार ५४० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. पदवी अभ्यासक्रमांसाठी ७४ हजार ७२९ मुले आणि ७५ हजार २५२ मुलींचा समावेश आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ९ हजार ५८९ मुले आणि १२ हजार ९५० मुलींचा समावेश असून इतर १ विद्यार्थ्याचा समावेश आहे.६०२ स्नातकांना पी.एचडी पदवीयावर्षीच्या दीक्षान्त समारंभामध्ये विविध विद्याशाखेतील ६०२ स्नातकांना विद्यावाचस्पती (पी.एचडी) पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी २६९, वाणिज्य व व्यवस्थापन १४५, मानवविज्ञान विद्याशाखेसाठी १०९ आणि आंतर-विद्याशाखीय अभ्यासशाखेसाठी ७९ पदव्यांची संख्या आहे. विद्यापीठाच्या विविध परीक्षांमध्ये प्राविण्य संपादन केलेल्या १९ विद्यार्थ्यांना २१ पदके मान्यवरांच्या हस्ते बहाल करण्यात आल्या आहे. यामध्ये १२ मुली व ७ मुलांचा समावेश आहे. त्याचबरोबर २ स्पर्धा पारितोषिकेही यावेळी प्रदान करण्यात आली.पदवी प्रमाणपत्रांचा तपशील डिजीलॉकरवर होणार उपलब्धःदीक्षान्त समारंभानंतर विविध विद्याशाखांतील विद्यार्थ्यांना त्यांचे पदवी प्रमाणपत्र डिजीलॉकरवर उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया विद्यापीठामार्फत सुरु आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे एबीसी आयडी खाते तयार आहेत अशा विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका आणि क्रेडिट्सचा तपशीलही डिजीलॉकरवर उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

# बी.एड. सीईटी परीक्षा अर्ज भरण्याची मोफत सुविधा

लातूर : बी. एड. २०२६–२७ प्रवेशासाठी सीईटी परीक्षेचे ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. इच्छुक उमेदवारांना येत्या २३ जानेवारीपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत. येथील शिवनगरातील राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेज येथे सीईटी परीक्षेचे मोफत ऑनलाइन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कॉलेजतर्फे करण्यात आले आहे.

बी.एड. प्रवेशासाठी आवश्यक असलेली सीईटी परीक्षा २७ ते २९ मार्च या कालावधीत होणार आहे. सीईटी परीक्षा नोंदणीसाठी अपार आयडी अनिवार्य आहे. सीईटी परीक्षेसाठी येत्या २३ जानेवारीपर्यंत ऑनलाइन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. येथील शिवनगरातील राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेजतर्फे सीईटी परीक्षेचे ऑनलाईन अर्ज भरण्याची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आवश्यक कागदपत्रांसह २३ जोनवारीपर्यंत कॉलेजमध्ये उपस्थित राहून विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे व कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. एम. चव्हाण यांनी केले आहे.

# जिप, पंस निवडणुकीसाठी लातूर ग्रामीणमधील भाजपाच्या मुलाखतीला इच्छूकांची मोठी गर्दी

लातूर - जिल्हा परिषद आणि पंचायत समिती करिता येत्या ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार असून या निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात असलेल्या जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणासाठी आयोजित करण्यात आलेल्या मुलाखतीसाठी इच्छुक उमेदवारांनी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या लातूर येथील संवाद या जनसंपर्क कार्यालयात प्रचंड गर्दी केली होती. उमेदवारी कोणालाही द्या आम्ही इच्छुक सर्वजण मिळून या निवडणुकीत शतप्रतिशत भाजपाचा विजय करू असे यावेळी अनेक इच्छुकांनी बोलून दाखविले.



लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील मुरुड, काटगाव, एकुर्गा, तांदूळजा, निवळी, भातांगळी, पानगाव, खरोळा, कामखेडा, पोहरेगाव आणि भादा ११ जिल्हा परिषद मतदार संघाबरोबर लातूर ग्रामीण मधील गावांचा समावेश असलेल्या हरंगुळ, महाराणाप्रताप नगर, आर्वी, उजनी, आशिव या सर्व जिल्हा परिषद आणि त्या अंतर्गत असलेल्या पंचायत समिती गणातील इच्छुक भाजपा उमेदवारांच्या मुलाखती राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष श्री पाशाजी पटेल यांनी घेतल्या याप्रसंगी लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड आणि माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे यांची उपस्थिती होती.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाच्या आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य शासनाच्या माध्यमातून लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी मतदार संघातील गावागावात विकासाच्या विविध योजनेसाठी लाखो नव्हे तर कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करून आणला. मतदार संघातील गावागावात वाडीवस्तीत मूलभूत सोयीसुविधाच्या विकासाबरोबरच सर्वांगीण विकासाची कामे मोठ्या प्रमाणात झाली आहेत. विविध गावात मंदिराचा जीर्णोद्धार, ग्रामपंचायत इमारत, नवीन पाणीपुरवठा योजना, सभागृह, शादीखाना, विविध समाजासाठी समाज मंदिरे, अंगणवाडी, सिमेंट रस्ते, नाली बांधकाम बरोबरच वैयक्तिक लाभाच्या घरकुल योजनेसह अनेक योजना प्रभावीपणे राबवल्या. विकास निधी काय असतो हे आ. रमेशआप्पांनी ग्रामीण भागाला दाखवून दिले आहे. यामुळे येत्या ५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत भाजपाचे उमेदवार विजय होणार अशी स्थिती संपूर्ण लातूर ग्रामीण मतदार संघात निर्माण झाली आहे.



लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात भाजपाची उमेदवारी म्हणजे विजय निश्चित हे जाणून जिल्हा परिषद गटासाठी आणि पंचायत समिती गणासाठी उमेदवारी मिळावी यासाठी इच्छुकांची भाजपाकडे मोठी गर्दी दिसून आली. शनिवार १७ जानेवारी रोजी भाजपाचे नेते मा. पाशा पटेल यांनी इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या. प्रत्येक जागेसाठी त्या त्या आरक्षणातील इच्छुकांची मोठी गर्दी दिसून आली. मुलाखतीसाठी आलेल्या प्रत्येक इच्छुक उमेदवारात मोठे उत्साहाचे वातावरण दिसून येत होते. भाजपाच्या संवाद कार्यालयात इच्छुक उमेदवारासह त्यांचे समर्थक ही मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक इच्छुकांनी आपल्याला उमेदवारी मिळावी अशी मागणी करून शक्य नाही झाल्यास उमेदवारी कोणालाही द्या आम्ही भाजपाच्या विजयासाठी सर्वजण मिळून एका दिलाने एका ताकतीने काम करू असे अनेकांनी बोलून दाखविले.

# जेष्ठ पत्रकार समाजभूषण भुजंग उर्फ उत्तम माधवराव कांबळे यांना शिवशंभु पुरस्कार

लातूर/प्रतिनिधी- लातूर येथील ज्येष्ठ पत्रकार साप्ताहिक राष्ट्रप्रेम वृत्तपत्राचे संपादक तथा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त समाजभूषण श्री भुजंग माधवराव कांबळे उर्फ उत्तम कांबळे यांना शिवशंभु हा पुरस्कार जाहीर झाला असून हा पुरस्कार वीर शिवशंभु संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथील श्री पांडुरंग लॉन्स जामगाव रोड येथे हा पुरस्कार संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते श्री अंबादासदादा दानवे, खा. धाराशिव श्री ओमप्रकाशदादा निंबाळकर, मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे आ. श्री सतिषभाऊ चव्हाण, गंगापूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष श्री संजयभाऊ जाधव, शिवशंभु संघटनेचे प्रदेशाध्यक्ष श्री हनुमंत वडजे पाटील यांच्या उपस्थितीत देण्यात येणार असून या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय युवती अध्यक्ष शरदचंद्र पवार गट श्रीमती सक्षणाताई सलगर, आ. श्री विलासबापू भुमरे पैठण आणि महिला जिजाऊ फाउंडेशन अध्यक्ष सौ. सुवर्णाताई जाधव आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये देण्यात येणार असून गेल्या ४० वर्षात पत्रकार, संपादक व सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर राहून निस्वार्थी भावनेने व विचाराने समाजभूषण श्री भुजंग उर्फ उत्तम कांबळे यांनी निस्वार्थी भावनेने व विचाराने कार्य प्रामाणिकपणे करीत आहेत. त्यांना छत्रपती वीर संभाजीराजे या महामानवाच्या नावाने शिवशंभु हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला. त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून प्रेस सेवा संघाचे अध्यक्ष श्री लहू शिंदे, पत्रकार ॲड. श्री बालाजी जगदाळे, समाजभूषण श्रीहरी कांबळे, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार श्री विजय गायकवाड, महाराष्ट्र शासन समाज भूषण पुरस्कार महासंघाचे अध्यक्ष श्री शेषराव करखेलीकर, लातूर बार कौन्सिलचे कोषाध्यक्ष गणेश कांबळे, समाजभूषण लक्ष्मण तिकटे, सामाजिक कार्यकर्ते श्री देविदास वाघमारे, ओबीसी भटके विमुक्त संघर्ष समितीचे अध्यक्ष श्री राजेंद्र वनारसे आदींनी अभिनंदन केले.



# ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादुर यांचे ३५० वे शहीदी समागम वर्ष; चित्रकला, निबंध स्पर्धांमध्ये लातूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग





लातूर : ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त लातूर जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करून श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविला जात आहे. यानिमित्त आज विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या कार्यावर आधारित निबंध लेखन व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविल्याचे पाहायला मिळाले.



नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त विशेष कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमांची तसेच श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या कार्याची माहिती घरोघरी पोहोचविण्यासाठी शिक्षण विभागामार्फत विशेष जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत शाळा व महाविद्यालयांमध्ये श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या जीवनावर आधारित माहितीपट, गीत दाखविणे यासह विविध स्पर्धांचे आयोजन केले जात आहे.

लातूर जिल्ह्यात शनिवारी सकाळच्या सत्रात विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये प्रभात फेरी काढून ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या कार्याची माहिती तसेच नांदेड येथे आयोजित कार्यक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली. श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या कार्याची महती सांगणारी घोषवाक्य असलेले फलक हाती घेत विद्यार्थ्यांनी या प्रभात फेरीत सहभाग नोंदविला.

**विद्यार्थ्यांनी रेखाटला श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचा जीवनपट**

जिल्हा परिषद शाळांसह जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय व खासगी शाळांमध्ये झालेल्या निबंध लेखन व चित्रकला स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. यावेळी विद्यार्थ्यांनी श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या कार्याची महती आपल्या निबंधांमधून मांडून त्यांच्या गौरवशाली इतिहासाला उजाळा दिला. तसेच चित्रकलेतून श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचे चित्र रेखाटून त्यांचा जीवनपट मांडण्याचा प्रयत्न केला.

# महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व नैसर्गिक वारशाचे ‘टीसीएस’कडून जतन

मुंबई : महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व नैसर्गिक वारशाचे जतन व संवर्धन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसच्या सहकार्यामुळे (टीसीएस) अधिक प्रभावीपणे होत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी खासगी क्षेत्राला वारसा जतन आणि संवर्धनात सहभागी करून घेण्याच्या धोरणाला चालना दिली आहे. महाराष्ट्रातील ऐतिहासिक स्मारके आणि नैसर्गिक परिसंस्थांच्या संरक्षणात ‘टीसीएस’ आणि टीसीएस फाउंडेशन सक्रिय भूमिका बजावत आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रेरणेतून गेल्या दशकात मुंबईतील ऐतिहासिक राजाबाई क्लॉक टॉवर आणि मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालय इमारतीच्या संवर्धन व पुनर्संचयितीकरणाचा महत्त्वपूर्ण प्रकल्प राबवण्यात आला आहे.

मुंबईतील १५६ वर्षे जुन्या राजाबाई टॉवरच्या बाह्य प्रकाशव्यवस्थेचे आधुनिकीकरण तसेच ग्रंथालयातील फर्निचर दुरुस्ती व पुनर्स्थापना या कामांना शासनस्तरावर मिळालेल्या पाठबळामुळे गती मिळाली. या प्रकल्पासाठी ‘टीसीएस’ने ८.९० कोटी रुपयांचे योगदान दिले असून, युनेस्कोने २०१८ च्या आशिया-पॅसिफिक सांस्कृतिक वारसा संवर्धन पुरस्कारांत या उपक्रमाची दखल घेतली आहे.




मुख्यमंत्री फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या संकल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय (सीएसएमव्हीएस) यांच्या संवर्धन व पुनर्संचयितीकरणाला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळाली. ‘टीसीएस’ने या प्रकल्पासाठी टप्प्याटप्प्याने एकूण २४.७९ कोटी रुपयांचे योगदान दिले. सन २०२२ मध्ये युनेस्कोच्या आशिया-पॅसिफिक सांस्कृतिक वारसा संवर्धन पुरस्कारांत ‘अवॉर्ड ऑफ एक्सलन्स’ मिळवणारा हा प्रकल्प वास्तुशास्त्रीय व अभियांत्रिकी दृष्टिकोनातून आदर्श ठरला. गेल्या १०० वर्षांतील हे संग्रहालयाचे पहिले मोठे पुनर्संचयितीकरण कार्य ठरले आहे.

# संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे; महानगरपालिका प्रशासनाकडून मुंबईकरांचे आभार

मुंबई : बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ - २६ अंतर्गत पार पडलेल्या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत सर्व घटकांचे सहकार्य लाभले. मुंबईकर मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मतदानाचा हक्क बजावला. एकूणच संपूर्ण निवडणूक मतदान प्रक्रिया शांततेत, पारदर्शक व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मुंबईकर नागरिक, सर्व राजकीय पक्ष, उमेदवार, कार्यकर्ते, प्रसार माध्यम, सर्व यंत्रणांनी मोलाचे सहकार्य केले.

या सहकार्याबद्दल बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्रि्वनी जोशी तसेच विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार, सहआयुक्त (करनिर्धारण व संकलन) विश्र्वास शंकरवार, अपर जिल्हाधिकारी (कोकण विभाग) तथा महानगरपालिका निवडणूक समन्वयक सहायक फरोग मुकादम, सहायक आयुक्त (कर निर्धारण व संकलन) गजानन बेल्लाळे यांनी सर्व घटकांचे मनःपूर्वक आभार मानले.बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २२७ नगरसेवक निवडीसाठी गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या कालावधीत मतदान प्रक्रिया पार पडली. एकूण मिळून १० हजार २३१ मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधा, मतदारांसाठी आवश्यक सोयी-सुविधा, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छता तसेच रॅम्प व मार्गदर्शक सूचना यांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात आली. एकूण ६४ हजार ३७५ मनुष्यबळाच्या प्रभावी व्यवस्थापनासह ४ हजार ५०० स्वयंसेवकांनी मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदविला. या निवडणुकीत मुंबई महानगरातील १ कोटी ३ लाख ४४ हजार ३१५ मतदारांपैकी सुमारे ५४ लाख ७६ हजार ०४३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यात पुरूष मतदारांची संख्या २९ लाख २३ हजार ४३३ इतकी; महिला मतदारांची संख्या २५ लाख ५२ हजार ३५९ तर इतर मतदारांची संख्या २५१ इतकी आहे. एकूण ५२.९४ टक्के मतदानाची नोंद झाली.संपूर्ण निवडणूक कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेची सर्व यंत्रणा व अधिकारी-कर्मचारी, कामगार अहोरात्र कार्यरत होते. यासोबतच मुंबई पोलीस दलातील सुमारे ३० हजार अधिकारी व अंमलदार प्रत्यक्ष बंदोबस्तात कार्यरत होते. तसेच केंद्र शासन, राज्य शासन, विविध प्राधिकरणे, बँका आणि निमशासकीय संस्थांमधील अधिकारी-कर्मचारी यांनीही निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी योगदान दिले.

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि माननीय राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या मार्गदर्शनानुसार अधिकारी व कर्मचारी, कामगार यांनी आपली जबाबदारी अत्यंत दक्षतेने पार पाडली.मतदान प्रक्रियेत सहभागी झालेले निवडणूक अधिकारी, कर्मचारी, पोलीस यंत्रणा तसेच इतर संबंधित विभागांनी दाखविलेल्या शिस्तबद्ध व समर्पित कामगिरीबाबत महानगरपालिका आयुक्त तथा जिल्हा निवडणूक अधिकारी भूषण गगराणी यांनी विशेष समाधान व्यक्त केले आहे. सर्व संबंधित यंत्रणांमधील समन्वयामुळे मतदान प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण होऊ शकली, असे त्यांनी नमूद केले. लोकशाहीचा हा महत्त्वाचा उत्सव यशस्वी होण्यासाठी सर्व घटकांनी दाखविलेल्या जबाबदारीमुळेच निवडणूक प्रक्रिया विश्र्वासार्ह व प्रभावी ठरली आहे. भविष्यातही प्रशासकीय कामकाजात सर्वच घटकांचे अशाच प्रकारचे सहकार्य अपेक्षित असल्याचे अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ.अश्रि्वनी जोशी यांनी नमूद केले आहे.

# सोपान यादवराव ठाकूर यांचा गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मान



लातूर : मूळचे निलंगा तालुक्यातील गौरचे रहिवासी असलेले विद्यार्थीप्रिय शिक्षक सोपान यादवराव ठाकूर यांना शनिवार, दि. १७ जानेवारी रोजी गुणवंत शिक्षक सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

सोपान यादव यांचे संपूर्ण कुटुंबच अव्याहतपणे शिक्षण क्षेत्रामध्ये ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत आले आहेत. त्यांचे वडील यादवराव ठाकूर हेही एक विद्यार्थीप्रिय तसेच उपक्रमशील शिक्षक म्हणून सेवारत होते. आपल्या सेवाकार्यात यादव गुरुजींनी असंख्य विद्यार्थ्यांना सहकार्य करण्याचे काम निरपेक्षपणे केलेले आहे. त्यांचे असंख्य विद्यार्थी आज विविध शासकीय - निमशासकीय क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. ज्ञानदान हेच आपल्या जीवनाचे सार मानून चालणाऱ्या यादवराव गुरुजींनी आपल्या मुली - मुलांनाही शिक्षण क्षेत्रात विद्यादानाचे कार्य करण्यास प्रेरित केले. त्यांचे चिरंजीव सोपान ठाकूर हे मागच्या सतरा वर्षांपासून नाशिक जिल्ह्यात विद्यादानाचे पवित्र कार्य करत आहेत. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या तालुकास्तरीय त्रैवर्षी अधिवेशनात त्यांचा मानचिन्ह , शाल श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. हा गौरव आपला एकट्याचा नसून आपल्याला सहकार्य करणाऱ्या सर्व सहकारी, कुटुंबीय यांचा असल्याची भावना याप्रसंगी त्यांनी व्यक्त केली. सध्या सेवानिवृत्त जीवन व्यतीत करणारे आपले पिताश्री यादवराव ठाकूर यांच्या सततच्या प्रेरणेने आणि प्रोत्साहनामुळे आपण शिक्षण क्षेत्रात चांगली कामगिरी करू शकत असल्याचेही त्यांनी बोलून दाखविले.

या पुरस्काराबद्दल दयानंद ठाकूर, सौ. बबिता ठाकूर, श्रीहरी जाधव, सुचिता ठाकूर, गोविंद ठाकूर, भागवत कवठेकर, अमोल सावंत, मनोज जांभळदारे ,गोपाळ जांभळदारे,तुकाराम चामे यासह संपूर्ण कुटुंबिय , मित्रमंडळींकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन



लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सात दिवशीय शिबिराचे आयोजन मौजे दावतपूर,ता. औसा,जि.लातूर येथे दि.१७ जानेवारी ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात आलेले आहे.'शाश्र्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास ' या विशेष वार्षिक युवक शिबिराचे उद्घाटन दि.१८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता मौजे.दावतपूर या गावी होणार आहे.या उद्घाटन समारंभ कार्यक्रमप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,उद्घाटक म्हणून संस्थेचे सचिव रमेश बियाणी व प्रमुख पाहुणे म्हणून स्वारातीम विद्यापीठाचे रासेयो माजी संचालक डॉ.शिवराज बोडके,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे,रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.सुरज कोल्हे व डॉ.अमोल ठोसर,दावतपूरचे सरपंच शिवदास कांबळे, उपसरपंच विठ्ठल बेडजवळगे, ग्रामविकास अधिकारी चलमले आर.एम.,मुख्याध्यापक संजीवन शिंदे,शाळा व्यवस्थापक समिती अध्यक्ष नितीन बिराजदार व उपाध्यक्ष शिवशंकर पाटील,तंटामुक्ती अध्यक्ष भारतबाई बिराजदार,पोलिस पाटील दत्तात्रय कुंभार, महसूल अधिकारी आर.एम.पुरी,बीडीओ औसाचे आनंदकुमार मिरगणे,औसाचे तहसीलदार घनश्याम अडसूळ,रासेयो सदस्य डॉ.राहुल मोरे,डॉ.गजानन बने,प्रा.मेघा आञाम,रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी विशाल तेलंगे व वैभवी माने यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या रासेयो शिबिराचा समारोप दि.२३ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे.या समारोपप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार व प्रमुख पाहुणे म्हणून पर्यावरण तज्ज्ञ सुपर्ण जगताप यांची उपस्थिती असणार आहे.या शिबिरास स्वाराती मराठवाडा विद्यापीठचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर,प्र. कुलगुरू डॉ.अशोक चव्हाण,रासेयो संचालक डॉ.मारोती गायकवाड,सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य बाबासाहेब पाटील, आमदार अमित देशमुख,खासदार शिवाजी काळगे,खासदार ओमराजे निंबाळकर,आमदार अमित देशमुख,आमदार अभिमन्यू पवार,जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर,रासेयो जिल्हा समन्वयक डॉ.बालाजी होकर्णे,पोलिस अधीक्षक अमोल तांबे, मिलिंद काळे,रासेयो विभागीय संचालक अजय शिंदे यांच्या संभाव्य भेटी होणार आहेत.सदरील रासेयो शिबिर यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे,रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.सुरज कोल्हे व डॉ.अमोल ठोसर व इतर सदस्य,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे,सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि रासेयो स्वयंसेवक विद्यार्थी सक्रिय आहेत.

# रेणापूर तालुक्यातील जिप, पंसच्या सर्वच जागेवर भाजपाचा विजय होणार - आ. रमेशआप्पा कराड






लातूर - रेणापूर बरोबरच लातूर पंचायत समितीवर यावेळी भाजपचा झेंडा फडकणार असून रेणापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या चार आणि पंचायत समितीच्या आठही जागेवर भाजपाचा विजय होणार असा आत्मविश्र्वास व्यक्त करून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी कामखेडा जिल्हा परिषद मतदार संघातून सौ. सरिता शंकरराव भिसे, कामखेडा पंस गणातून शरद दरेकर, मोटेगाव पंस गणातून संतोष चव्हाण यांची तर पोहरेगाव जिल्हा परिषद गटातून सौ. मनीषा दशरथ सरवदे निवाडा पंस गणातून प्रा. विष्णू गोरे यांची भाजपाच्या वतीने उमेदवारी जाहीर केली.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने कामखेडा जिल्हा परिषद मतदार संघाचा विजय संकल्प मेळावा शुक्रवारी सायंकाळी रेणापूर तालुक्यातील मौजे भोकरंबा येथे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे हे होते. याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड, सेवानिवृत्त सनदी अधिकारी शंकरराव भिसे, भाजपाचे नवनाथ भोसले, रेणापूरच्या नगराध्यक्षा शोभा आकनगिरे, माजी सभापती अनिल भिसे, भाजपाचे दशरथ सरवदे, मंडलाध्यक्ष शरद दरेकर, सरपंच संघटनेचे अध्यक्ष विजय गंभीरे, सरपंच राजू हाके, उपसरपंच राजू शेख, विष्णू गोरे, ज्ञानोबा भिसे, राम मोरे, अजय गुडे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. मोठ्या उत्साहाच्या वातावरणात पार पडलेल्या या मेळाव्यास अनेक गावचे सरपंच लोकप्रतिनिधी, भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्यासह हजारोचा जनसमुदाय उपस्थित होता. यात महिलांची मोठी संख्या होती. आ. कराड यांचे भोकरंबा गावात आगमन होताच फटाक्याची आतिषबाजी करत वाजत गाजत जोरदार स्वागत करण्यात आले.

या मेळाव्यात बोलताना भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेल्या साठ वर्षात काँग्रेसने गरिबांना गरीबच ठेवण्याचे पाप केले. नरेंद्रजी मोदी यांच्या रूपाने देशात आणि देवेंद्रजी फडणवीस यांच्या रूपाने राज्यात परिवर्तन झाले आणि खरा विकास काय असतो हे त्यांनी दाखवून दिले. गोरगरीब अठरा पगड जाती धर्मासाठी अनेक योजना सुरू करून त्याचा प्रत्यक्ष लाभ देण्याचे काम केले. गेल्या पंधरा वर्षात रेणापूर भागाला काँग्रेसवाल्यांनी विकासापासून वंचित ठेवण्याचे काम केले. सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या मेहनतीने, कष्टाने आणि मतदारांच्या आशीर्वादाने प्रस्थापिताची सत्ता उलटून टाकण्याचे काम झाले. मला विधानसभेत काम करण्याची संधी मिळाली. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्यानंतर या भागाला न्याय देण्याचे आणि गोरगरिबांची सेवा करण्याचे काम करत असून आम्ही जे बोलतो ते करून दाखवतो असे सांगितले.

काँग्रेसवाल्यांनी आमदार असतानाही त्र्यंबकनानांना आणि वैजनाथ दादांना काहीच काम करू दिले नाही. पोहरेगाव भागातील खराब रस्त्याचे पाप कोणाचे आहे असा प्रश्न उपस्थित केला. विकासाची दिशा दिसली म्हणूनच त्र्यंबकनाना भिसे यांनी भारतीय जनता पार्टी प्रवेश केला असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, आजपर्यंत मी एकटाच देशमुखाविरुद्ध लढत होतो आता त्र्यंबकनानाच्या माध्यमातून मला एक खंबीर साथीदार मिळाला आहे. ३० - ४० वर्षानंतरही मांजरा, रेणा साखर कारखान्यावर आज कोट्यावधी रुपयाचे कर्ज कसे या प्रश्र्नाचे उत्तर स्वतःला स्वच्छ, प्रामाणिक साखरसम्राट समजणाऱ्यांनी द्यावे. या साखर कारखान्याच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्याच्या कष्टाची चोरी करून मिळवलेला पैसा प्रत्येक निवडणुकीत वापरला जातो. याचा जाब विचारल्याशिवाय काँग्रेसवाले जमीनवर येणार नाहीत असेही त्यांनी बोलून दाखवले.

केंद्रात भाजपाची राज्यात भाजपाची सत्ता असल्याने जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत भाजपाची सत्ता आल्याशिवाय ग्रामीण भागाच्या विकासाला गती मिळणार नाही. रेणापूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या चार आणि पंचायत समितीच्या आठही जागा बहुमताने जिंकण्याचा संकल्प करण्यासाठी हा मेळावा असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड यांनी कामखेडा जिल्हा परिषद मतदार संघातून सौ. सरिता शंकरराव भिसे, कामखेडा पंस गणातून शरद दरेकर, मोटेगाव पंस गणातून संतोष चव्हाण यांची तर पोहरेगाव जिल्हा परिषद गटातून सौ. मनीषा दशरथ सरवदे निवाडा पंस गणातून प्रा. विष्णू गोरे यांची भाजपाच्या वतीने उमेदवारी जाहीर केली. विकास कामाच्या आधारावर रेणापूर तालुक्यात भाजपाचे सर्वच्या सर्व उमेदवार बहुमतानी विजयी व्हावेत यासाठी प्रयत्न करावेत असे आव्हान केले.

स्व. विलासराव देशमुख आश्र्वासक नेतृत्व होते त्यांनी कधीच कार्यकर्त्यांचा कामापुरता वापर केला नाही आज काँग्रेसकडे तसे आश्र्वासक नेतृत्व दिसत नाही मला अनेक वाईट अनुभव आले असल्याचे सांगून या मेळाव्यात बोलताना माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे म्हणाले की, नरेंद्र मोदी आणि देवेंद्रजी फडणवीस हे विकासात्मक, आश्र्वासक नेतृत्व देशाला आणि राज्याला लाभले आहे. त्यांच्या माध्यमातून सर्वत्र विकासाची मोठी कामे होत आहेत. आमदार असताना राज्यातील सत्तेवर असलेल्या भाजपा सरकारने कोणतेही काम घेऊन गेलो तर कधीच दुजाभाव केला नाही. भाजपाच्या माध्यमातूनच विकास कामे होऊ शकतात याची खात्री पटल्यानेच मी भाजपात प्रवेश केला असल्याचे त्यांनी बोलून दाखवले.

रमेशआप्पा सर्व सामान्यांना चोवीस तास उपलब्ध असणारे सक्षम आमदार आहेत त्यांच्या माध्यमातून मतदार संघात विकासाची अनेक कामे होत असल्याचे सांगून त्र्यंबकनाना भिसे म्हणाले की, केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना गरजूपर्यंत शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्यासाठी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती भाजपाच्या ताब्यात घेणे गरजेचे असून येत्या पाच तारखेला रेणापूर तालुक्यातील सर्वच्या सर्व भाजपाचे उमेदवार विजयी करून रमेशआप्पा कराड यांच्या पाठीशी ताकद उभी करावी असे आवाहन केले.

युवा नेते ऋषिकेशदादा कराड यावेळी बोलताना म्हणाले की, विकास कामासाठी या मतदारसंघाला वीस वर्ष संघर्ष करावा लागला रमेशआप्पांच्या माध्यमातून या मतदार संघात विकास कामे होत असताना दिसत आहेत. शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी कायमस्वरूपी सुरू ठेवण्यासाठी मतदारांनी भाजपाच्या पाठीशी कर्ज म्हणून आशीर्वाद द्यावेत. येणाऱ्या काळात निश्र्चितपणे अपेक्षेपेक्षा अधिक काम करून व्याजा सगट कर्जाची परतफेड करण्याची क्षमता भाजपाची आहे. विधानसभा निवडणुकीत ज्याप्रमाणे रमेशआप्पा कराड साहेबांवरती विश्र्वास टाकला त्याचप्रमाणे जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत भाजपाच्या उमेदवारावर विश्र्वास ठेवून आशीर्वाद द्यावेत असे आवाहन केले.

यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, जिल्हा चिटणीस दशरथ सरवदे यांनी आपले मनोगत व्यक्त करून रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात भाजपाला साथ द्यावी असे आवाहन केले. प्रारंभी माजी सभापती अनिल भिसे यांनी आपल्या प्रास्ताविकातून मेळाव्याच्या आयोजना मागची भूमिका विषद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे, प्रा. धायगुडे यांनी केले तर शेवटी श्रीमंत नागरगोजे यांनी आभार मानले.

यावेळी अभिषेक आकनगिरे, पद्माकर चिंचोलकर, साहेबराव मुळे, रमेश खाडप, रवींद्र नागरगोजे, परमेश्र्वर जाधव, श्रीकृष्ण पवार, सुनील चेवले, नवनाथ माने, राजेश घोडके, किशन क्षिरसागर, दौलत पवार, अजित पाटील, नानासाहेब कसपटे, रेणापूर नगरपंचायतीचे दत्ता सरवदे, श्रीकृष्ण मोटेगावकर, विजय चव्हाण, महेश गाडे, रमेश खाडप, मारूफ आत्तार, शेख अजीम, विश्र्वजीत कदम, राहुल नागरगोजे, दीपक पवार, शिवाजी सोमवंशी, बाळासाहेब मुदामे, परमेश्र्वर बिडवे, अनंत पाटील, राज जाधव, बालाजी राठोड, धनंजय पवार, नरेश चपटे, निळकंठ भिसे, हुजूर शेख, संतोष रांजणे, सुदीप भिसे, हाजी शेख, नवनाथ रांजणे, राहुल भिसे, नय्युम शेख, अजय राठोड, सचिन शिंदे, दिलीप हेडे, मंजूर पठाण, ज्ञानेश्र्वर भिसे, रमेश रांजणे, जाकीर शेख, मारुती गोरे, दाजी साहेब हाके, अकबर शेख, नरसिंह गोरे, समीर पठाण, रफिक शेख, अफजल पठाण, शशिकांत हाके, मोहन हाके, मतीन शेख, नितीन गोरे, कमलाकर भिसे यांच्यासह आणि कामखेडा जिल्हा परिषद मतदार संघातील भोकंरबा गावासह विविध गावागावातील वाडी वस्तीतील भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी मतदार बंधू भगिनी हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.